# महाराष्ट्र शासन

## वन विभाग

### वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६

### ई- निविदासूचना

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व),मुंबई - ४०००६६.येथील उद्यानांतील बंदिस्त हिंस्त्र मांसाहारी प्राण्याकरिता १५० किलो प्रति दिवस (गुरुवार सोडून) म्हशीचे ताजे मांस सन २०२१-२२ करिता पुरवठा करणेबाबत अधिकृत खाद्य पुरवठा परवाना धारकांकडून ई-निविदा वनसंरक्षक,संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व) यांचे नावाने मागविण्यात येत आहेत.

१) सदर निविदा सूचना व निविदा प्रपत्र WWW.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ०६/०९/२०२१ ते दि. २१/०९/२०२१ पर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ऑन लाईन भरण्याची अंतिम दि. २१/०९/२०२१ रोजी संध्या.५.०० वाजेपर्यंत आहे.

२) ई-निविदा प्रपत्राची किमंत रु. १५०००/- इसारा रक्कम रु. १,५०,०००/-राहिल.

३) निविदाकाराने त्यांच्या निविदा दि. ०६/०९/२०२१ ते दि. २१/०९/२०२१ पर्यंत संध्या ५.०० वाजेपर्यंत ई-टेंडरीग पध्दतीने सादर कराव्यात. सदर निविदा दि. २३/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.

४) निविदा बाबतच्या सविस्तर अटी व शर्ती निविदा प्रपत्रात सोबत नमुद करण्यात आलेल्या आहेत.

५) कोणतीही निविदा कोणत्याही कारणास्तव मजुंर करणे अथवा नामंजूर करणेचा अधिकार वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली. मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे.

(जी.मल्लिकार्जुन)
वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली

ठिकाण : बोरीवली.

दिनांक :३०/०८/२०२१

# महाराष्ट्र शासन

**वनविभाग संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई - ४०० ०६६ येथील**
**उद्यानातील हिंस्त्र मासांहारी प्राण्याकरिता ताज्या मासांचा पुरवठयाबाबच्या अटी / शर्ती /नियम.**
**सन २०२१ ते २०२२**

## बंदिस्त हिंस्त्र मांसाहारी प्राण्याकरिता ताज्या मांसाचा पुरवठयाबाबतच्या अटी /शर्ती / नियम.

१) निविदाकार हा मांस पुरवठा व्यवसायाशी संबंधित असणे जरुरी आहे. त्यास किमान मागील १ वर्षाचा मांस पुरवठयाचा अनुभव असणे जरुरी आहे. त्या संदर्भातील त्यांना मांस पुरवठा करण्यांत आलेल्या यंत्रणेचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करावे. त्यात दर व पुरवठा केलेला कालावधी व प्रमाणात/परिमाण नमूद करणे.तसेच FSSAI परवाना निविदे सोबत सादर करावा.

२) उद्यानातील वन्यप्राण्यांना पुरविणेत येणारे मांस हे म्हशीच`ताजे व त्याच दिवशी कापलेले रक्ताचा अंश असलेले (स्पेशलकटस्) मागील पायांचा मासंल भाग, पाठीवरील मांस (हाडांचा भाग नसलेले) किडणी लिव्हर इत्यादी सर्व आवश्यक भागाचे मिश्रण असलेल` हाडाचे प्रमाण कमी असलेले देवनार/ठाणे /भिंवडी/कल्याण पशुवधगृह येथील पशुवैद्यकीय तंज्ञानी प्रमाणित केलेले व कापलेल्या बीफ कटसवर संबंधित पशुवधगृह यांची मोहर असलेले उच्च दर्जाचे मासांचा पुरवठा करावा लागेल.

३) वर नमुद कत्तल खान्यातून प्रमाणित करण्यांत आलेल्या मांसाचाच पुरवठा स्वत:चे खर्चाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्राण्यांच्या पिंजऱ्यापर्यंत सायंकाळी**३.३. ते ४.३०** या वेळेत पोहोच करावा लागेल.फक्त मंडीच्या दिवशी किंवा अपवादात्मक परिस्थितीत मांसाचा पुरवठा **सायंकाळी ५.३०** वाजेपर्यन्त स्विकारणेत येईल. योग्य कारणाशिवाय मांस पुरवठा ठरलेल्या वेळेत पोहोचला नाही, तर विलंबाबाबत प्रतिदिन **रु. १०००/-** दंड आकाराला जाईल व या विभागांतील मजुरांना द्यावी लागणारी जादा मजुरीची रक्कम मक्तेदाराने मजुरांना त्याच वेळी देण्यात यावी, अन्यथा सदरची रक्कम मांस पुरवठयाचे देय बीलांतून कापून घेतली जाईल.

४) काही अपरिहार्य कारणास्तव संबंधित कत्तलखाना बंद असल्यास व ताजे मांस पुरवठा उपलब्ध न झाल्यास स्थानिक बाजारातून निर्यात गुणवत्तेचा म्हशीचे गोठविलेले हाड विहरीत मांस/ताजे चिकन मांस/गोठविलेले चिकन मांस पुरवठा करावा लागेल. विभागामार्फत स्थानिक बाजारातून प्रचलित दराप्रमाणे वरीलप्रमाणे खाद्य खरेदी करण्यात येईल व खरेदी करण्यात आलेल्या फरकाची रक्कम आपल्या मुळ देयकातून वसूल करण्यात येईल. मांस , चिकन, मटण पुरवठा करणे ज्या दिवशी शक्य नसेल त्या दिवसाच्या अगोदर एक दिवस प्रशासनाला कळविणे आवश्यक आहे. तरच प्रशासनाला पर्यायी व्यवस्था करता येईल तसे न केल्यास ठेकेदारांना **प्रति दिन १०००/- रु.**दंड करणेत येईल. दंडाची रक्कम त्यांच्या बिलातून वसूल करण्यात येईल.

५) पुरविण्यात मासांचे परिमाण हे मागणी केलेल्या प्रमाणाच्या ५ टक्के कमी/जास्त प्रमाणात स्विकारले जाईल. कोणत्याही परिस्थितीत निश्चित केलेल्या परिमाणापेक्षा ५ टक्के कमी अथवा जास्त पुरवठा स्विकारला जाणार नाही, निश्चित करण्यात आलेल्या परिमाणा पेक्षा कमी पुरवठयाची भरपाई निविदा धारकांस त्याचवेळी करुन घ्यावी लागेल. तसे नकेल्यास या विभागामार्फत स्थनिक बाजारातून त्यावेळी प्रचलीत असलेल्या भावाने मांसाचे/इतर मास प्रकाराची खरेदी केली जाईल आणि या खरेदी व वाहतुकीपोटी खर्च झालेली रक्कम निविदा धारकाचे देयकामधून वसूल करण्यांत येईल.

६) काही कारणास्तव जर मांस पुरवठा कमी/जास्त प्रमाणात लागणार असले, अथवा काही कालावधीसाठी नको असेल तर त्याबाबत मक्तेदारास एक दिवस अगोदर सुचित करण्यात येईल व त्यानुसारच मांसचा पुरवठा स्विकारला जाईल.

७) पुरविण्यांत येणाऱ्या मांसामध्ये किंवा अन्य खाद्य पदार्थात जर सर्व किंवा थोडेही मांस खराब अगर भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास पुरवठा केलेले संपूर्ण मांस अस्विकृत करणेत येईल आणि अशा परिस्थितीत दुसऱ्या ताज्या मांसचा तात्काळ पुरवठा करावा लागेल आणि तसा पुरवठा न केल्यास आवश्यक तेवढे मांस स्थानिक बाजारांतून खरेदीकेले जाईल. बाजारात आवश्यक तेवढे मांस उपलब्ध न झाल्यास प्राण्यांना खाण्यांस योग्य असलेल्या इतर प्राणी /अथवा ब्रायलरचे मांस बाहेरुन (स्थानिकरित्या) खरेदी करणेत येईल आणि तशा खरेदीपोटी (वाहतुकीसह) मंजुर दरापेक्षा जास्त झालेल्या खर्चाची रक्कम मक्तेदारांच्या त्या महिन्याच्या एकूण देय असलेल्या बीलांतून कापून घेतली जाईल.

८) आठवडयांतून एक दिवस बहुधा दर गुरुवारी अगर ठरविलेल्या दिवशी मांस पुरवठा घेतला जाणार नाही.

९) पुरवठा केलेल्या मांसची रक्कम शक्यतोवर महिन्यांतून एक वेळा धनादेशाद्वारे अदा केली जाईल. मांस पुरवठयाची रक्कम रोख अथवा आगाऊ दिली जाणार नाही.

१०) निविदाधारककाकडून जर निकृष्ठ दर्जाचे मांसचा पुरवठा केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच काही वेळेस संबंधित कत्तलखाना येथे मरणासन्न अवस्थेतील खटाऱ्यावरिल प्राण्यांचे मांस आणले जाते अशा प्रकारच्या प्राण्यांचे मांस कोणत्याही परिस्थतीत स्विकारले जाणार नाहीत. निकृष्ठ दर्जाचे मांस खाल्यामुळे प्राण्यांस कसल्याही प्रकारचा त्रास झाल्यास अथवा प्राणी मृत्युमुखी पडल्यास त्यासाठी निविदाधारक हयांस पूर्णपणे जबाबदार धरण्यात येईल व निविदा धारकाचा मांस पुरवठा बाबतचा परवाना रद्द करण्याबाबत संबंधित शासकीय यंत्रणेस शिफारस करण्यात येईल आणि झालेल्या नुकसानीची भरपाई रक्कम निश्चित करण्याचे अधिकार वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना राहतील.

११) नैसगिक आपत्ती किंवा डिझेल दरवाढ इत्यादी कारणांमुळे भावबंद नमुद केलेल्या दरांत कोणत्याही प्रकारे बदल करणेत येणार नाही.

१२) मांस पुरवठा कोणत्याही परिस्थितीत नोंदविलेल्या मागणी प्रमाणे आणि ठरविलेल्या वेळेतच करण्याचा असून तो उत्तम प्रतिचा ताजा व ठरविलेल्या परिमाणातच करणेचा आहे.

१३) निविदा मंजूर झालेल्या निविदा धारकाकडून त्यांच्या बिलांतून २.३४ टक्के किंवा शासकीय नियमाप्रमाणे नियमित आयकर वसूल केला जाईल.निविदासोबत मागील १ वर्षाचे आयकर विवरण पत्र सादर करावे.

१४) निविदा धारकाकडून उपरोक्त कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कार्यवाही करण्यापूर्वी मत्तेकेदारांस त्यासंदर्भात त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाईल व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नंतरच त्यांचे विरुध्द मक्ता रद्द करणे अगर दंडाची रक्कम आकारणेबाबत जरुर ती कार्यवाही केली जाईल.

१५) वरील पैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत जर निविदा धारकाकडून वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी दंडकेल्यास किंवा निविदा रद्द केला असल्याबद्दलचे आदेश

१६) निविदा धारकांस दिल्यास निविदा धारकांस असे आदेश मिळाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांचेकडे अपिल दाखल करता येईल. यावर अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई. यांनी दिलेले आदेशअंतिम असतील.

१७) प्राण्यांनी खाऊन शिल्लक राहीलेले मांस, हाडे वगैरे जागेवरुन गोळा करुन दुसऱ्या दिवशी त्याची विल्हेवाट लावणेकामी त्यांचे खर्चाने उलचून न नेल्यास त्यांनी पुरवठा केलेले ताजे मांस स्वीकारले जाणार नाही.

१८) करारनामा झाल्यानतंर निविदा धारक पूर्वसूचना न देता निविदा मध्येच सोडून गेल्यास कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल व त्यांचे सर्व अंतिम अधिकार वनसंरक्षक व सचांलक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना असतील.

१९) मांस पुरवठा करण्यात येणारे वाहन हे स्वच्छ /हवेशीर व तळाला ॲल्युनियम पत्रा असलेले आणि मांस ठेवलला भाग कुलुप बंद केलेला असावा. मांस हे झाकलेले असावे. तसेच दररोज वाहनाचे निर्जंतुकीकरण केले नंतरच मांस पुरवठा करण्यात यावा.

२०) यशस्वी ई-निविदा धारकास या कार्यालयाचे प्रारंभ आदेशाच्या दिनांकापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी ई-निविदा मधील मंजुर दराप्रमाणे ताजे मांस पुरवठा करणे बंधनकारक राहील.

२१) सदर कराराची मुदत संपल्यानंतर पुढील दर निश्चित होऊन नविन कबुलायत होईपर्यंत मध्यंतरीच्या काळात वरील दरानेच खाद्य पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

(जी.मल्लिकार्जुन)
वनसंरक्षक व संचालक,
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान,
बोरीवली

**ठिकाण : बोरीवली.**

**दिनांक :३०/०८/२०२१**